RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२३)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ६६

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LVIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL, COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६५ चा महा ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे.

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

सन १९६५ चा महा ४०.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० च्या कलम ५८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ५८ च्या पोट-कलम (१) मध्ये उप-कलम (क) नंतर पुढील उप-कलमे दाखल करण्यात येतील :–

(ड) नगरपालिकेच्या कार्यकारी प्रशासनाच्या बाबतीत आणि लेखे आणि अभिलेखे यासंबंधीच्या बाबतीत नगरपालिकेच्या (मुख्य अधिकाऱ्यांच्या) कामावर व कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवतील आणि

(ई) राज्य शासनाला किंवा संचालकाला किंवा जिल्हाधिकाऱ्याला किंवा राज्य शासन वेळोवेळी प्राधिकृत करील अशा इतर कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला, नियमाद्वारे विहीत करण्यात येतील असे राज्य शासन संचालक, जिल्हाधिकारी किंवा असे अधिकारी कोणत्याही वेळी मागविल असा अहवाल, विवरणे किंवा अभिलेख सादर करेल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ अन्वये सुधारणा करण्यात आली असून सुधारित अधिनियमानुसार नगरपरिषदा/ नगरपंचायतीमध्ये कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याच्या अधिकारात वाढ करण्यात आली आहे. परिणामी, लोकप्रतिनिधींच्या अधिकारावर गदा आली असल्याचे निदर्शनास येत आहे. लोकप्रतिनिधी हे जनतेमधून निवडून आलेले असतात व त्यांच्यामधून नगराध्यक्ष निवडण्यात येत असतो. नगराध्यक्षाला जनतेप्रती उत्तरदायित्व असते. मुख्याधिकारी पदावरील अधिकारी प्रशासनातून आलेला असल्याने तो मनमानी पध्दतीने काम करीत असतो/निर्णय घेत असतो व त्याचा परिणाम नागरिकांवर होत असतो. परिणामी हवा तसा न्याय देता येत नाही. अशा परिस्थितीत नगरपालिकेच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर नगराध्यक्ष पदावरील अधिकाऱ्यांचे लक्ष व नियंत्रण असणे तितकेच आवश्यक आहे असे वाटते.

म्हणून हे सुधारणा विधेयक प्रस्तावित करण्यात आले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १६ जून २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.